अस्सल सोलापुरी
सुराज्य सोलापूर

शहरात आढळला स्वाइन फ्लूचा रुग्ण

महापालिका आरोग्य विभाग यंत्रणा सतर्क

सोलापूर/प्रतिनिधी

शहरात स्वाइन फ्लू आजाराचा रुग्ण आढळला आहे. त्याचबरोबर तीन स्वाइन फ्लू सदृश्य रुग्णही असल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली.

सोलापूर शहरात स्वाइन फ्लू आजाराचे रुग्ण आढळून आल्याची बाब स्पष्ट झाली आहे. शहरातील अशोक चौक येथील एकाच कुटुंबातील हे चारही रुग्ण आहेत. त्यापैकी एक रुग्ण स्वाइन फ्लू आजाराने बाधित (पॉझिटिव्ह) आहे तर उर्वरित तीन रुग्ण स्वाईन फ्लू सदृश्य आहेत. या रुग्णांवर अश्विनी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चौघांची ही प्रकृती स्थिर आहे.सोलापूर महापालिका आरोग्य प्रशासनाकडून स्वाईन फ्लू आजाराच्या नियंत्रणासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत आहे. नागरिकांनी या संदर्भात आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी केले आहे.

पाटलांनी 'शड्डू' ठोकले, दादांचे 'टेन्शन' वाढले...

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

आ.बबनदादा शिंदे

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातही मोर्चेबांधणीला वेग येवू लागला आहे.प्रत्येक विधानसभा मतदार संघात इच्छुकांची भाऊगर्दी दिसत असून प्रत्येकजण मैदानातील राजकीय पक्षांची ताकत अजमावत आहे. सोलापूर जिल्ह्यातही महायुती आणि महाविकास आघाडी अशीच दुरंगी लढत होणार असून सध्या गुडघ्याला बाशिंग बांधलेल्या इच्छुकांचा केवळ शड्डू ठोकून आपला इरादा सांगण्याचा उद्योग सुरू आहे. पंढरपूरमधील श्रीविठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटलांनी दंड थोपटले असून माढा विधानसभा मतदार संघाच्या आखाड्यात उतरण्याचा निर्धार सूचक वक्तव्यातून बोलून दाखवला आहे. त्यामुळे माढ्याचे विद्यमान आमदार बबनदादा शिंदे यांच्या कार्यकर्त्यांचे टेन्शन एकाएकी वाढले आहे.

झाले असे की, माढा तालुक्यातील राजकीयदृष्ट्या ताकतवान असलेल्या टेंभुर्णी शहरात कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याच्या उद्घाटनासाठी पाटील हे टेंभुर्णीला आले होते.त्यावेळी त्यांनी केलेल्या राजकीय विधानाने माढा मतदार संघात खळबळ माजली आहे.

मी माढ्याची कुस्ती जिंकायला आलोय, असे म्हणत पाटील यांनी कुस्तीचा सामना रंगवत एकप्रकारे जणू विधानसभेसाठी शड्डू ठोकला आहे,असे माढ्याच्या राजकारणात मानले जात आहे. गेल्या सहा टर्म.पासून माढ्यातून एकतर्फी विजय मिळवणारे जेष्ठ आमदार बबनदादा शिंदे हे त्यांचे पुत्र रणजीत सिंह शिंदे यांना मैदानात उतरवण्याचा तयारीत आहेत. निर्धार केल्याप्रमाणे पाटलांनी माढ्यात उडी घेतल्यास माढ्याचा सामना रंगतदार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पाटील यांनी माढ्यात माढा केसरी या कुस्ती स्पर्धांचे आयोजन करत विधानसभेसाठी रणशिंग फुंकले आहे. या स्पर्धेला माढ्यातील नागरिकांनी प्रचंड मोठा प्रतिसाद देत पाटील यांचे जंगी स्वागतही केले. यावेळी माढ्यात कुस्ती खेळायला नाही तर जिंकायला उतरलो आहे,असे विधान त्यांनी केलयनंतर माढ्यात अनेक नेत्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.

मागील सहा टर्म पासून माढ्यात एकतर्फी विजय मिळवणारे जेष्ठ आमदार बबनदादा शिंदे यांना आव्हान देणे सोपे नसले तरी यंदा आमदार शिंदे हे त्यांचे सुपुत्र रणजीत सिंह शिंदे यांना मैदानात उतरवायचा तयारीत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे तिकीट मिळवण्यासाठी सध्या अनेकांची धडपड सुरू आहे. यात आमदार शिंदे यांचे पुतणे धनराज शिंदे हे देखील प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात येते.

माढा विधानसभा मतदार संघात राजकीय भूकंप...

फिल्डिंग कशी असेल

शरद पवार गटाकडून संजय बाबा कोकाटे, शिवबाबा मोहिते पाटील, शिवाजीराजे कांबळे तसेच यांच्या नावांची उमेदवारीसाठी चर्चा आहे. महायुतीकडून शिवसेनेचे संपर्कप्रमुख शिवाजी सावंत तर अजित पवार गटाकडे सध्या येथील आमदारकी असून विद्यमान आमदार हे महायुतीकडून न लढता शरद पवार यांची तुतारी किंवा अपक्ष लढण्याच्या तयारीत असल्याची ही चर्चा आहे. अशातच पाटील यांनी माढ्यातून जोरदार तयारीला सुरुवात केल्याने ही लढत बहुरंगी होण्याची शक्यता आहे. माढा केसरी स्पर्धेसाठी नागरिकांनी प्रतिसाद दिल्याने पाटील हेही रेस मध्ये उतरू लागले आहेत अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

आधी तळ्यात मग मळ्यात

पाटलांनी दंड थोपटले असलेतरी त्यांचा राजकीय घरोबा अद्याप स्पष्ट झालेला नाही. माढा लोकसभा मतदारसंघात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला समर्थन दिल्यानंतर महायुतीच्या नेत्यांचे पित्त खवळले.लागलीच पंढरपूरच्या स्थानिक नेत्यांनी मुंबईत चाव्या फिरवल्या.एका दिवसातच श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर जप्तीची कारवाई सुरू झाली.पाटील गडबडून गेले.त्यानंतर राजकीय चुलीचे तोंड फिरवत ते पुन्हा महायुतीच्या दावणीला गेले. कारवाई मागे घेण्यात आली. पाटलांना मोठा मोठा दिलासा मिळाला होता. आधी पवारांचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या पाठीशी उभे असलेल्या पाटील यांनी कारखान्यावरील कारवाईनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यानंतर लगेचच माढा आणि सोलापूर मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांना पाठिंबा जाहीर केला होता. दुर्दैवाने दोन्ही उमेदवारांना पराभवाचा झटका बसला.

राजकीय गणित काय?

बबनराव शिंदे हे सध्या अजित पवार यांच्यासोबत आहेत. अभिजित पाटलांनी नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्याऐवजी महायुतीला पाठिंबा दिला. ते देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जातात. त्यामुळे ते विधानसभा लढल्यास भाजपकडून रिंगणात उतरु शकतात. यावरुन भाजप-राष्ट्रवादीत तणातणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सध्या स्थिती काय?

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचा बालेकिल्ला म्हणून माढ्याची ओळख आहे. २००९ मध्ये या मतदारसंघाची निर्मिती झाल्यानंतर शरद पवार येथून खासदार झाले होते. त्यानंतर २०१४ मध्ये विजयसिंह मोहिते पाटील हे खासदार झाले. पुढे २०१९ ला त्यांनी भाजप प्रवेश केला. माढा विधानसभेत सध्या बबनाराव शिंदे हे अजित पवार गटाचे म्हणजे महायुतीचे आमदार आहेत. २०१९ च्या निवडणुकीत रणजीत सिंह नाईक निंबाळकर हे विजयी झाले होते.

अखेर शहरातील दोन्ही उड्डाणपुलांची काढली निविदा

आमदार विजयकुमार देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

सोलापूर : अनेक वर्षांपासून रखडलेल्या जुना पुना नाका ते सात रस्ता व पत्रकार भवन ते जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन या दोन्ही उड्डाणपुलांची निविदा अखेर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने काढली आहे. या दोन्ही उड्डाणपुलाच्या कामासाठी सुमारे ११०० कोटी रुपये खर्च होणार आहेत. आमदार विजयकुमार देशमुख यांनी यासाठी वारंवार पाठपुरावा केला होता. अखेर त्याला यश आले आहे.

शहरातील दोन्ही उड्डाणपूलाचे काम रखडले होते. शहरातील वाहतुकीचा विचार करता उड्डाणपूल होणे अत्यंत गरजेचे होते. आ. विजय देशमुख यांनी उड्डाणपूलासाठी केंद्रीय सडक व परिवहन मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सतत पाठपुरावा केला होता.

वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनीही आमदार देशमुख हे यासाठी वारंवार पाठपुरावा करत आहेत हे जाहीर सभेत सांगितले होते. अखेर त्याला यश मिळाले आहे. या दोन्ही उड्डाणपुलाच्या कामांची निविदा प्रक्रिया प्रसिद्ध झाली आहे.

ऑक्टोबरमध्ये कामाला सुरुवात होणार

शहराच्या विकासासाठी शहरात उड्डाणपूल होणे गरजेचे होते. मी पालकमंत्री असताना या उड्डाणपूलास मान्यता मिळाली होती. प्रशासकीय तांत्रिक अडचणी कामास विलंब झाला. परंतु सर्व अडचणीवर दूर झाल्या आहेत. ऑक्टोबर महिन्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. मोदी सरकार आणि राज्यातील महायुती सरकार हे विकासाभिमुख सरकार आहे. निवडणूकीत जे आश्वासन दिले, ते पूर्ण होत आहे याचा आनंद आहे, असे आ. विजय देशमुख यांनी म्हटले आहे.

भाजी विक्रेती खून प्रकरणात दुचाकीस्वार अडकला

आरोपींच्या कोठडीत वाढ

सोलापूर/प्रतिनिधी

६० वर्षीय भाजीवाल्या महिलेच्या सोन्याच्या दागिन्याच्या मोहातून नियोजीतपणे खून केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या ५ आरोपींपैकी २ दोन जणांची पोलीस कोठडी वाढवण्यात आली असून, दोघा जणांना प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी डी.आर.भोला यांनी न्यायालयीन कोठडी सुनावली.

या प्रकरणात एक विधी संघर्ष बालक आहे. याशिवाय या प्रकरणात आणखी एका व्यक्तींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.या प्रकरणातील चोरीस गेलेले सोने त्या महिलेने कुणास विकले, किती खर्च केले, याचा तपास होण्यासाठी आरोपीपैकी एका महिलेची पोलीस कोठडी वाढविण्यात आली आहे.

या रिक्षाच्या पाठीमागे फिरणाऱ्या एका दुचाकीस्वाराचा या प्रकरणात संबंध असल्याने त्यालाही अटक करण्यात आल्यावर त्याची पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.यात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील वैशाली बनसोडे तर आरोपीतर्फे ॲड.आर.एस.पाटील व ॲड.कांबळे यांनी काम पाहिले.

इटकळ येथे नशेत आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर : इटकळ (ता. तुळजापूर) येथे राहणाऱ्या अवधूत शिवलिंग कोळी (वय २८) याने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्याला नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करून एकनाथ (भाऊ) यांनी बेशुद्ध अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सुट्ट्या संपल्या पण...?

कल्याण
389-04-266

मुंबई
135-91-236

चूल पेटवताना वृद्ध महिला भाजून जखमी चुकीच्या माहितीने पोलिसांची झाली धावपळ

सोलापूर/प्रतिनिधी

घरगुती भांडणात भावासोबत तक्रार झाल्याने रागाच्या भरात भावाने पेटवून दिल्याने ६५ वर्षीय महिला भाजून गंभीर जखमी झाली. ही घटना शहरातील रमाबाई आंबेडकर नगरात सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. मात्र पोलिसांनी तिचा जबाब घेण्यासाठी रुग्णालयात गेले असता चूल पेटवताना भाजल्याच्या जवाब जखमी महिलेने दिला आहे.

वज्रेश्वरी विठ्ठल पवार (वय ६५ रा. रमाबाई आंबेडकर नगर) असे भाजलेल्या वृद्ध महिलेचे नाव आहे. आज दुपारी ३ वाजेच्या सुमारास त्यांच्या घरात हा प्रकार घडला होता. त्यांची भावजय (लक्ष्मी पवार) यांनी त्यांना भाजलेल्या अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले.

राखी पौर्णिमेच्या दिवशी हा अनुचित प्रकार घडल्याने पोलिसांचे पथक त्वरित शासकीय रुग्णालय गाठले. आणि भाजलेल्या वज्रेश्वरी पवार यांची चौकशी केली. तेव्हा त्यांनी भावाने पेटविले नसून दुपारच्या सुमारास चूल पेटवताना आपण भाजल्याचा जबाब दिला. या घटनेची नोंद जोडभावीपेठ पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार गायकवाड करीत आहेत.

भावासोबत झाली होती तक्रार?

सिव्हीलमध्ये नेल्यावर राहत्या घरात भावासोबत तक्रार झाल्याने त्यांचा भाऊ रमेश पवार यांनी त्यांना पेटवून दिल्याचे सुरुवातीला त्या महिलेच्या भावजयीने सांगितले होते. त्याप्रमाणे सिव्हिलच्या पोलिसांनी एमएलसी दाखल करून त्याची माहिती जोडभावीपेठ पोलिसांना कळविली होती. पोलिसांनी त्यांचा जवाब नोंदविला. मात्र महिलेकडे चौकशी केल्यानंतर तिने भाजून जखमी झाल्याचे सांगितले. चुकीची माहिती कळविल्याने पोलिसांना विनाकारण धावपळ करावी लागली.

DTE Code : 06223
Nagesh Karajagi
Pradnya Niketan Education Society, Pune
ORCHID COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY, SOLAPUR
A+ NAAC (With CGPA 3.32)
• Approved by AICTE, Govt. of Maharashtra • Affiliated To DBATU University, Lonere
The Place for Real Placements
AN AUTONOMOUS INSTITUTE
Locally Rooted Globally Competent Education
OUR NUMBERS SPEAK...
400+ PLACEMENTS-2024
Rigorous Preparations for Placements
Top Recruiters Last Five Years
TIAA 63 | TATA 248 | wipro 158 | ZenSar 36 | Persistent 56 | Infosys 67 | Capgemini 58 | accenture 37 | Hexaware 49

COURSES OFFERED

COURSE	INTAKE	GENERAL CHOICE CODE
B.Tech.- Artificial Intelligence & Data Science	60	0622399510
B.Tech.- Civil Engg.	60	0622319110
B.Tech.- Computer Sci. & Engg.	180	0622324210
B.Tech.- Electronics & Tele. Comm. Engg.	60	0622337210
B.Tech.- Electrical Engg.	60	0622329310
B.Tech.- Mechanical Engg.	120	0622361210
M.Tech.- Civil- Computer Aided Structural Analysis & Design Engg.	12	0622393810
M.Tech.- Mech.- Thermal Engg.	06	0622361010
M-Tech-- Mech-- E-Vehicle Technology	06	0622396410

National Education Award-2018 Outstanding Education Institute (West) ABP News
MHRD Ministry Ranked for Institute-Innovation Council
84 Students Qualified MPSC/ UPSC till now
31 Research Patents
71 Students selected for MS at UK, USA, Germany etc.
Special Coaching for GATE, GRE, TOEFL & IELTS
Facility for Online Option Form Filling for CAP Round-II is available in Our College from 20/08/2024 to 22/08/2024
142 Students GATE Qualified
Features of NKOCET
• MoU with MNC's like Tata Technologies, Dassault Systems, Zensar Technlogies, Spitzen Energy Solution, MSEDCL etc.
• Book-Bank facility for every student.
• Well equipped Laboratories
• More than 20% Ph.D. faculties from IIT & NITS
• Collaboration with industries for research project.
• Wi-Fi & CCTV enabled campus
• Earn and learn scheme for needy students.
• Student gym & sports facility- Artificial turf for football, cricket is well developed
• Well furnished Boys and Girls Hostel.
• Partnership with Foreign University- Poly Tech. Nancy, France
• Highly qualified and experience faculty members.
AICTE-CII Survey Industry Linked Technical Institute Ranked in Platinum Band consecutively for three years
Visit us
Reach us
Prof. S. D. Jadhav 9552529255 (FY B.Tech)
Dr. V.S. Shirwal 9552529258
Dr. N. R. Patil 8275938799 (For DSE)
Mr. S. S. Shelke 9552529291 (Registrar)
Gut No. 16, Solapur-Tuljapur Road, Tale Hipparaga, Solapur-2. Ph.: 9423084363, Web : www.orchidengg.ac.in, E-mail : office@orchidengg.ac.in